## माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर यांचे कार्यालय

### —: जाहीर निविदा :—

जिल्हा न्यायालय, चंद्रपूर अंतर्गत कार्यरत व पात्र एकुण १११ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकरीता (८९ पुरुष कर्मचारी व २२ स्त्री कर्मचारी) खालील कोष्टकातील विवरणानुसार शासकीय गणवेश कापड खरेदी करावयाचे आहे.

| गणवेश प्रति कर्मचारी | गणवेशाचा रंग | कापडाची प्रत | कापडाची रुंदी (पन्हा) | प्रती व्यक्ती आवश्यक कापड | एकुण कापड खरेदी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| अर्ध्या बाह्याचे ३ शर्ट | पांढरा | ६७% पॉलीस्टर ३३% कॉटन | ८९ से.मी. | २ मीटर प्रति शर्ट प्रमाणे ३ शर्ट करीता एकुण ६ मीटर कापड | ८५ कर्मचाऱ्यांकरीता, एकुण ५१० मीटर |
| अर्ध्या बाह्याचे २ शर्ट | पांढरा | ६७% पॉलीस्टर ३३% कॉटन | १३८ से.मी. | २ मीटर प्रति शर्ट प्रमाणे २ शर्ट करीता एकुण ४ मीटर कापड | ०४ कर्मचाऱ्यांकरीता एकुण १६ मीटर <u>एकुण ८९ पुरूष कर्मचाऱ्यांकरिता ५२६ मिटर</u> |
| लांब विजारी ३ नग | पांढरा | ६७% पॉलीस्टर ३३% कॉटन | ८९ से.मी. | १ मीटर ३० सेमी प्रति विजार प्रमाणे ३ विजार करीता एकुण ३.९० मीटर कापड. | ८५ कर्मचाऱ्यांकरीता एकुण ३३१.५० मीटर |
| लांब विजारी २ नग | पांढरा | ६७% पॉलीस्टर ३३% कॉटन | १३८ से.मी. | १ मीटर ३० सेमी प्रति विजार प्रमाणे २ विजार करीता एकुण २.६० मीटर कापड. | ०४ कर्मचाऱ्यांकरीता एकुण १०.४० मीटर <u>एकुण ८९ पुरूष कर्मचाऱ्यांकरिता ३४१.९ मिटर</u> |
| साडी ३ नग | फिक्कट निळया रंगाची व काळी किनार असलेली | ६७% पॉलीस्टर ३३% कॉटन | ११८ से.मी. | ५ मीटर प्रति साडी. | २२ महीला कर्मचाऱ्यां करीता एकुण ६६ साड्या |
| ब्लाउज ३ नग | फिक्कट निळया रंगाचा | ४८% पॉलीस्टर ५२% कॉटन | ... | ८० से. मी. प्रति ब्लाउज या प्रमाणे ३ ब्लाउज करीता एकुण २.४० मीटर कापड. | २२ महीला कर्मचाऱ्यां करीता एकुण ५२.८० मीटर ब्लाउजचे कापड |

वरील आकाराचे व प्रकाराचे गणवेश कापड खालील अटी व शर्तीचे आधिन राहून पुरविण्यास तयार असल्यास बाब निहाय कापडाचा प्रति मीटर/प्रती नग दर पत्रकाची निविदा (१० सें.मी. लांबीचे आकाराचे कापडाच्या नमुण्यासह) सिलबंद लिफाफा जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांचे नावाने <u>दिनांक २५ जानेवारी, २०२४</u> पावेतो मिळतील अशा बेताने पाठवावे सदर निविदेच्या लिफाफ्यावर "<u>शासकीय गणवेश कापडाची निविदा</u>" असा ठळक उल्लेख अवश्य करावा.

<u>निविदेच्या अटी व शर्ती</u> :–

१. कमी दराची निविदा म्हणून जर आपली निविदा मंजुर झाली तर शर्ट, विजार व ब्लाउज साठी खालील प्रमाणे कापडाचे स्वतंत्र तुकडे पुरवावे लागतील.

अ) प्रति कर्मचारी ३ शर्ट करीता ६ मीटर कापडाचे ८५ तुकडे व प्रति कर्मचारी २ शर्ट करीता ४ मीटर कापडाचे ४ तुकडे.

ब) प्रति कर्मचारी ३ विजार करीता ३.९० मीटर कापडाचे ८५ तुकडे व प्रति कर्मचारी २ विजार करीता २.६० मीटर कापडाचे ४ तुकडे.

क) प्रति स्त्री कर्मचारी ३ ब्लाउज करीता २.४० मीटर कापडाचे २२ तुकडे.

२. कमी दराची निविदा म्हणून जर आपली निविदा मंजुर झाल्यास मागणी नोंदविल्यापासुन एक महिण्याच्या आंत पुरवठा करणे बंधन कारक राहील.

३. नोंदविलेल्या मागणीच्या पुरवठ्यात कापडाची प्रतवारी व प्रमाण यात काही त्रुटी असल्यास किंवा काही तफावत आढळल्यास पुरवठा केलेला कापड परत करण्यात येईल.

४. मुदतीनंतर प्राप्त झालेली निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

प्रबंधक,

जिल्हा न्यायालय, चंद्रपूर